लोकमत पु.पा.४.


# फटाका सायलेन्सरवर कधी फिरवला जाणार बुलडोझर?

## आवाज असह्य, केवळ दंड न आकारता नष्ट करणे आवश्यक

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये अनेक दुचाकीस्वार कर्णकर्कश फटाका सायलेन्सर लावून मिजाशीत मिरवत असतात. त्या सायलन्सरचा आवाज असह्य आणि त्रासदायक असतोच, शिवाय अचानक असे दुचाकीस्वार जवळून गेल्यास पादचारी आणि अन्य वाहनचालकही काहीसे घाबरतात-गडबडतात. त्यामुळे अशा दुचाकीस्वारांवर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे; पण असे सायलेन्सर बसवणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. केवळ दंड न आकारता सायलेन्सर जप्त करून ते नष्ट करणे गरजेचे आहे. तसेच अशा दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल करून कारवाई करणे गरजेचे आहे. पालकांनीही आपली तरुण मुले दुचाकीला असले सायलेन्सर लावत नाही ना, याकडे लक्ष दिले पाहिजे.



### तीन महिन्यांत एका वाहन चालकावर कारवाई

मीरा-भाईंदरमध्ये वाहतूक पोलिसांनी १ जानेवारी ते मार्चअखेरपर्यंत केवळ एका दुचाकीच्या फटाका सायलेन्सरवर कारवाई केली आहे.

### फटाका सायलेन्सर जप्त करणे गरजेचे


मिरा-भाईंदर शहरात फटाका सायलेन्सर लावून धुडगूस घालणाऱ्या दुचाकीचालकांवर ठोस आणि धडक कारवाईची आवश्यकता आहे. नवघर पोलिस ठाण्यात राम भालसिंग हे निरीक्षक असताना अशा फटाका सायलेन्सर मोठ्या संख्येने जप्त करून त्यावर जेसीबी चालवण्यात आला होता. मात्र, त्यानंतर अशी कारवाई पुन्हा दिसली नाही. त्यामुळे वाहनचालकांकडून असा सायलेन्सर बसविला जात आहे.

### फटाका सायलेन्सर लावाल तर जबर दंड

- गेल्या तीन महिन्यांत एका दुचाकीवर कारवाई करून १ हजाराचा दंड वसूल केला गेला आहे. २०२२ सालच्या पहिल्या पाच महिन्यांतच तत्कालीन वाहतूक निरीक्षक रमेश भामे यांनी २२१ दुचाकींवर कारवाई करून २ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल केला होता.
- कर्णकर्कश हॉर्न लावणाऱ्या २२ वाहनांवर कारवाई करून ११ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला गेला होता. त्यावेळीही कारवाई थांबल्यावर दुचाकीचालक पुन्हा फटाका सायलेन्सर वापरू लागल्याचे कळताच पोलिसांनी अगदी पाठलाग करून त्यांना पकडले होते.

### कारवाई होत नसल्याने फटाका सायलेन्सरची वाढली संख्या

फटाका सायलेन्सर लावून कर्णकर्कश आवाजाने लोकांना घाबरवणाऱ्या दुचाकीस्वारांवरील कारवाई गेल्या तीन महिन्यांपासून ठप्प झाली आहे. त्यामुळे असे सायलेन्सर लावून फिरणारे मोकाट झाले आहेत.



### ...तर पोलिस तुम्हालाही लावतील फटाका

कर्णकर्कश आवाज करणारे फटाका सायलेन्सर लावाल, तर पोलिस दंडासह अन्य कायदेशीर कारवाईही करू शकतात.

# भिवंडीत पोलिसच निघाला अडीच लाखांचा गुटखा चोर

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवंडी :** चोराला पकडण्याची, गुन्हा उघडकीस आणण्याची जबाबदारी असणाऱ्या पोलिसानेच गुन्ह्यात जप्त केलेल्या अडीच लाखांच्या प्रतिबंधित गुटखा मालावर डल्ला मारण्याचा प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. जितेंद्र सुरेश पाटील असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिस शिपायाचे नाव आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी गुन्हे शाखेने मागील महिन्यात गुटखा तस्करी करणाऱ्या वाहनावर कारवाई करीत निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करून मुद्देमाल जप्त करून ट्रक आणि त्यामधील सुगंधित पान मसाला व गुटख्याच्या गोण्यांचा साठा भिवंडी गुन्हे शाखेच्या आवारात ठेवला होता. दरम्यान गुन्हे शाखेत कार्यरत पोलिस शिपाई जितेंद्र पाटील याला १४ मार्च २०२३ रोजी रात्रपाळीत ठाणे अंमलदार ड्युटीवर नेमण्यात आले होते. त्यावेळी पाटील याने त्याच्या दोन साथीदारांसोबत संगनमत करून या प्रतिबंधित गुटख्याची काळ्या बाजारात एकूण २ लाख ५८ हजार ४८ रुपये किमतीचा सुगंधित पान मसाला विक्री केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी गुन्हे शाखेतील सहायक पोलिस निरीक्षक धनराज चंद्रभान केदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शांतीनगर पोलिस ठाण्यात मंगळवारी जितेंद्र पाटील आणि त्याच्या दोन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

CamScanner

लोकमत ५.५.१९.

# घोडबंदरच्या टॉवरमध्ये पाच मिनिटे नळाला पाणी, टँकरसाठी जागरण

## ५५ टॉवरमधील त्रस्त रहिवाशांनी घेतली भाजप नेत्यांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : उन्हाळा सुरू झाल्याने घोडबंदरच्या गृहसंकुलांना पाणीटंचाईच्या तीव्र झळा सहन कराव्या लागत आहेत. अनेक टॉवरमध्ये नळाला जेमतेम पाच ते दहा मिनिटे पाणी येते. उन्हाळा वाढल्याने टँकरची टंचाई जाणवू लागली असून टँकरची वाट पाहत रात्री दोन ते तीन वाजेपर्यंत येथील रहिवासी जागे असतात. या भागातील ३० गृहसंकुलांना पाणी टंचाईच्या झळा बसत असल्याची बाब मागील आठवड्यात उघड झाली होती. आता आणखी २२ गृहसंकुलांना पाणी टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. भाजपचे आमदार संजय केळकर यांनी याकडे लक्ष वेधले असून तातडीने समस्या सोडविली नाही तर दहा दिवसांत आंदोलनाचा इशारा दिला.

घोडबंदर भागासाठी घोषणा होऊनही पाणीपुरवठ्यात वाढ झाली नाही. त्यामुळे या भागातील संकुलांना पाणी टंचाईच्या झळा बसत आहेत. या भागातील ३० गृहसंकुलांमधील रहिवाशांनी केळकर यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे पाणीटंचाईच्या समस्येची व्यथा मांडली. याच मुद्द्यावरून केळकर यांनी पालिका कारभारावर प्रश्न उपस्थित केला. पाणी समस्येवर तोडगा काढण्याऐवजी महापालिका टँकरमाफियांना पोसत असल्याचा आरोप केळकर यांनी केला होता. महापालिकेने नवीन इमारतींना परवानगी देणे बंद केले पाहिजे, अशी मागणी करत येत्या दहा दिवसात पाण्याचे नियोजन केले नाही तर स्वत: रस्त्यावर उतरून ठाणे महापालिकेवर मोर्चा काढू, असा इशारा त्यांनी दिला. यानंतरही पाणीपुरवठ्यात सुधारणा झालेली नसून आणखी २२ गृहसंकुलांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. या संकुलातील रहिवाशांनी भाजप आमदार निरंजन डावखरे यांची भेट घेऊन त्यांच्यापुढेही समस्या मांडल्या. पाण्याचे योग्य वाटप केलेच पाहिजे, अन्यथा प्रशासनाला कायद्याचा बडगा उगारावा लागेल, असा इशारा येथील रहिवाशांनी दिला.



### 'लवकरच तोडगा काढू'

■ दरम्यान, महापालिका प्रशासनाबरोबर चर्चा करून लवकरच या प्रश्नावर तोडगा काढू, असे आश्वासन आमदार डावखरे यांनी रहिवाशांना दिले. घोडबंदर येथील कावेसर भागातील कांचनपुष्प संकुल परिसरातील २२ संकुलांमधील नागरिकांना गेले वर्षभर दिवसातून अवघे पाच मिनिटे पाणीपुरवठा होत आहे. अनेक संकुले पाण्याच्या टँकरसाठी वणवण करीत आहेत.

लोकसत्ता पा.नं.४.

# मराठा आरक्षण समितीच्या बैठकीत गोंधळ

## चंद्रकांत पाटील यांच्या हकालपट्टीची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई** : मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी गोंधळ घालून उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हकालपट्टीची मागणी केली. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून ५० टक्क्यांच्या आतील आरक्षण मिळायला हवे, अशी समाजाची मागणी आहे. पण पाटील हे समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न



करीत असल्याचा आरोप करून पदाधिकाऱ्यांनी बैठकीत घोषणाबाजीही केली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत मंगळवारी सह्याद्री अतिथीगृहात झाली. बैठकीमध्ये मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पाटील यांना अनेक प्रश्न केले. मात्र त्यांनी उत्तरे दिली नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि सुविधा देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. बार्टी, महाज्योतीच्या धर्तीवरच सारथीमार्फत सवलती आणि सुविधा देण्यासाठी सर्वंकष समान धोरण तयार करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. यावेळी ग्रामविकास व वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभुराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार योगेश कदम, आमदार प्रवीण दरेकर, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पाटील उपस्थित होते.

CS CamScanner

पुढारी पा.नं.५.

# वसई धोकादायक वीज यंत्रणा बदला

## वसई तालुका शिवसेनेची महावितरणकडे मागणी

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

शिवसेना वसई तालुक्यातर्फे गेलेल्या शिष्टमंडळाने वसईतील महावितरणच्या अधीक्षक अभियंतायांची भेट घेऊन नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊन धोकादायक वीज यंत्रणा बदलण्याची मागणी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला (१३ एप्रिल) विरार-मनवेलपाडा येथून कारगिल नगर येथे निघालेल्या मिरवणुकीदरम्यान तब्बल सहा जणांना विजेचा जबर धक्का लागला आहे. यातील दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर तिघे गंभीर जखमी असून, त्यांचीही प्रकृती गंभीर असल्याचे कळते आहे. या दुर्घटनेनिमित्ताने वसई महावितरणचा निष्काळजी व भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलेला आहे.



या पार्श्वभूमीवर शिवसेना आक्रमक झाली असून, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटीका सौ.किरण चेंदवणकर , शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रविण म्हाप्रळकर , शिवसेना तालुका प्रमुख स्वप्निल बांदेकर तसेच शिवसेना विधानसभा संघटक विनायक निकम , युवासेना जिल्हा अधिकारी सिद्धेश जोगळे आणि शिवसेना विरार शहर प्रमुख उदय जाधव, नालासोपारा शहर सचिव किशोर पाटील, महीला आघाडी सौ.शिला लष्करे यांच्या शिष्टमंडळाने जाऊन वसई विरार महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडे विस्कळीत झालेल्या विद्युत यंत्रणेबद्दल तीव्र नाराजगी व्यक्त केली आहे. तसेच यावेळी विविध मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. यावेळी झालेल्या बैठकित महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात आली. वसई विरारमधील लोंबकळणाऱ्या वीजवाहिन्यांमुळे जीवितहानीच्या घटना घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पुढारी पा-नं.३.

# १५६ फौजदारांना संवर्ग मिळूनही पदोन्नती नाही

**मुंबई : प्रसाद जाधव**

नियमानुसार संवर्ग मिळूनही पदोन्नतीची प्रतीक्षाच करावी लागल्याने राज्य पोलीस दलातील अनेक फौजदार एसीपी किंवा डीवायएसपीची बढती न मिळताच निवृत्त होऊन घरी जाण्याची चिन्हे आहेत. गृह खात्याने वेळेत निर्णय घेतला तर या फौजदारांना बढतीसह वाढीव वेतनाचा आणि ओघानेच वाढीव निवृत्ती वेतनाचा लाभ मिळेल.

राज्य पोलीस दलात १९९१ ते १९९३ च्या तुकडीत १७५ जण पोलीस उपनिरीक्षक पदी भरती झाले होते. यातील सर्व उपनिरीक्षक बढती मिळून मागील १० ते १५ वर्षांपासून राज्यातील विविध भागात पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. नियमानुसार त्यांना सहाय्यक पोलीस आयुक्त किंवा उपअधीक्षकची पदोन्नती मिळाली पाहिजे होती. मात्र गृह विभागाच्या उदासीन धोरणामुळे त्यांची पदोन्नती रखडली असून त्यातील अनेकजण सेवानिवृत्त झाले आहेत. १७५ पैकी आता १५६ पोलीस अधिकारी संवर्ग मिळूनही पदोन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत.

पोलीस दलात नियमानुसार १० वर्ष पोलीस निरीक्षकपदी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना सहाय्यक पोलीस आयुक्त किंवा उपअधीक्षकपदी पदोन्नती देण्यात येते. मात्र दहा वर्षांचा कालावधी उलटूनही अनेक पोलीस अधिकारी पदोन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत.

# नामांकित कंपन्यांचे बनावट शर्ट विकणे भोवले

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

← म.टा. पु.पा.१.

नामांकित कंपन्यांच्या बनावट कपड्यांची विक्री करणे मिरा-भाईंदरमधील एका कापड विक्रेत्याला भोवले आहे. या व्यापाऱ्याच्या दुकानात लाखो रुपयांचे नामांकित कंपनीच्या नावाचे बनावट कपडे आढळल्याने, कॉपीराईट कायद्यानुसार नवघर पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदरमधील काही कापड विक्रेत्यांकडून नामांकित कंपन्यांच्या नावे बनावट कपड्यांची विक्री केली जात असल्याची माहिती संबंधित कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार कंपनीच्या अधिकाऱ्याने भाईंदर पूर्वेस एका दुकानात तपासणी केली. यावेळी त्याला दोन नामांकित कंपन्यांचे बनावट कपडे आढळून आले. यामध्ये ४६ हजार रुपयांचे २३ शर्ट, तर २८ लाख ५७ हजार रुपये किंमतीचे दोन हजार ३०० टीशर्ट आढळले. हे सर्व कपडे नुकतेच जप्त करण्यात आले होते.

कंपनीच्या वतीने संबंधित अधिकाऱ्याने नवघर पोलिस ठाण्यात तक्रार केल्यानंतर, पोलिसांनी कुसुम सोनी व त्यांच्या कुटुंबातील इतर दोघे अशा तिघा जणांविरोधात कॉपीराइट कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

सकाळ २०·५-१.

# ७४ महिलांचा वनवास संपुष्टात

## वेश्या व्यवसायाला प्रवृत्त करणाऱ्यांवर ५६ गुन्हे

वसई, ता. १९ (बातमीदार) : वसई-विरार मिरा-भाईंदर परिसरात चोरी छुपे वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणाऱ्यांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. आतापर्यंत एकूण ७४ पीडितांची सुटका करून विविध पोलिस ठाण्यांत ५६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात महिला आरोपींची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे.

वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात विविध लॉज, पार्लर आणि सदनिकेच्या आड वेश्या व्यवसाय केला जात असल्याचे पोलिसांनी केलेल्या कारवाईतून समोर आले आहे. हा व्यवसाय चोरी-छुपे होत आहे. वसईसह, मिरा-भाईंदर परिसरात अशा घटना होत असताना पोलिसांनी करडी नजर ठेवत बनावट ग्राहकांच्या माध्यमातून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या माध्यमातून आरोपींना गजाआड केले आहे.

### ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर

सर्व प्रथम ग्राहकांना ऑनलाईन यंत्रणेच्या माध्यमातून मुलींचे फोटो दाखवले जातात. त्यानंतर सौदा केला जातो. त्यानंतर ठरलेल्या ठिकाण दलाल मुलींना तिथे नेतात. अशा प्रकारे हा सर्व व्यवसाय ऑनलाईन यंत्रणेच्या माध्यमातून चालवला जातो.



### पार्लरच्या नावाखाली अश्लील धंदे

१ काही ठिकाणी मसाज पार्लरच्या नावाच्या आड अश्लील धंदे केले जातात. अशा ठिकाणची माहिती पोलिसांना मिळताच बोगस गिऱ्हाईक पाठवून शहनिशा करत सापळा रचून धाड टाकली जाते आणि मुलींची सुटका करून आरोपींना अटक करत गुन्हे दाखल केले जात आहे.

२ एप्रिल महिन्यात लॉजिंगमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने नालासोपाऱ्यामधील कळंब येथे एका पीडित महिलेची या जोखडातून सुटका; तर ३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### लॉजमध्ये छुपा व्यवसाय

शहरात काही ठिकाणी लॉजच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय चालवला जातो. येथील कर्मचारी ग्राहकांशी संवाद साधून व्यवस्था होईल, असे सांगतो. अशा ठिकाणी पोलिसांनी नजर ठेवत अनेकांना गजाआड केले आहे.

### ३८ महिलांवर कारवाई

वेश्याव्यवसाय करणाऱ्यांत महिला आरोपींचाही समावेश आहे. गेल्या पंधरा महिन्यांत अशा एकूण ३८ महिलांवर कारवाई करण्यात आली.

### पोलिसांची कारवाई




---

## दहा दिवसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद

नालासोपारा (बातमीदार) : अर्नाळा येथील एका रिसॉर्टच्या तरणतलावात बुडालेल्या पाच वर्षांच्या चिमुरड्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असल्याची घटना उघड झाली आहे. याबाबत दहा दिवसांनंतर अर्नाळा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. चैतन्य गोविंदसिंह कथागत असे मृत मुलाचे नाव असून तो ठाण्यात राहत होता. कथागत कुटुंबीय ठाण्यावरून ८ एप्रिल अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शितल समुद्र मिनी गोवा बीच नाका या रिसॉर्टवर पिकनिकसाठी आले होते. तेव्हा ही दुर्घटना घडली.

## विकासकामांच्या लोकार्पणासाठी फडणवीस शनिवारी मिरा-भाईंदरमध्ये

भाईंदर, ता.१९ (बातमीदार): उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी (ता.२२) मिरा भाईंदरच्या दौऱ्यावर येत आहेत. शहरातील विविध विकासकामांचे भूमीपूजन तसेच लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेने भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाखाली अद्ययावत सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष उभारला आहे. या नियंत्रण कक्षाचे लोकार्पण शनिवारी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते केले जाणार आहे. यानंतर हा कक्ष पोलिसांकडे हस्तांतर केला जाणार आहे. याच उड्डाणपुलाखाली महापालिकेने पशु पक्षी उपचार केंद्रही उभारले आहे त्याचेही लोकार्पण यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते केले जाणार आहे. मिरा रोड येथील रुग्णालयाचे आरक्षण असलेल्या भुखंडावर महापालिकेकडून कर्करोग उपचारासाठी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या रुग्णालयाचे तसेच महापालिका बांधणार असलेल्या दहा मजली समाज मंदिराच्या कामाचे भुमीपूजन शनिवारी फडणवीस यांच्या हस्ते पार पडणार आहे. याव्यतिरिक्त महापालिकेने काशी मिरा उड्डाणपुलाखाली बांधलेल्या उद्यानाचे तसेच उर्दू शाळेचे लोकार्पणही फडणवीस यांच्या हस्ते केले जाणार आहे. उपमुख्यमंत्री शनिवारी दुपारी एक वाजता मिरा भाईंदरमध्ये येणार असून भूमीपूजन तसेच लोकार्पण पार पडल्यानंतर जाहीर कार्यक्रम महापालिकेच्या लता मंगेशकर नाट्यगृहात होणार आहे.

## बनावट कपडे विक्रीप्रकरणी व्यापाऱ्यासह दोघांवर गुन्हा

भाईंदर, ता. १९ (बातमीदार) : नामांकित कंपन्याचे नाव वापरुन बनावट तयार कपड्यांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यासह त्याच्या दोन सहकाऱ्यांवर कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यापाऱ्याकडे नामांकित कंपन्यांचे लाखो रुपयांचे बनावट कपडे मिळून आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

भाईंदर पूर्व येथील बाळाराम पाटील रस्त्यावर असलेल्या एका दुकानात दोन नामांकित कंपन्यांचे बनावट कपडे विक्री केली जात असून कपड्यांचा मोठा साठा असल्याची माहिती त्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दुकानातील कपड्यांची तपासणी केली त्यावेळी त्यांना त्यांच्या कंपन्यांचे लाखो रुपयांचे बनावट शर्ट व टी-शर्ट आढळून आले. अधिकाऱ्यांनी हे कपडे जप्त करुन नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

सकाळ ५.५.१९.



# एमआयडीसीची पाणीकपात

मिरा भाईंदरला वाढवून देण्यात आलेले पाणी एमआयडीसीने पुन्हा कमी केले आहे. यासंदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन पाणीपुरवठा पूर्ववत केला जाईल.
- प्रताप सरनाईक, आमदार

## मिरा-भाईंदरवासीयांची पाण्यासाठी वणवण

भाईंदर, ता. १९ (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहराला एमआयडीसीकडून मिळणाऱ्या वाढीव पाण्यात पुन्हा एकदा कपात झाली आहे. एमआयडीसीकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात पाच दशलक्ष लिटरने वाढ करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात केली होती. त्यानंतर लगेचच या पाण्यात वाढ झाली; मात्र ही वाढ मार्च महिन्यापर्यंतच टिकली. गेल्या वीस ते बावीस दिवसांपासून एमआयडीसीकडून पुन्हा एकदा मिरा भाईंदरच्या पाणीपुरवठ्यात पाच ते सात दशलक्ष लिटरने कपात करण्यात आली आहे. परिणामी उद्योगमंत्र्यांनी दिलेले वाढीव पाण्याचे आश्वासन कागदावरच राहिले आहे. याचा फटका सध्या तीव्रतेने जाणवू लागला आहे. आधीच शहराला कमी मिळत असलेल्या पाण्यात यामुळे आणखी घट झाली असून ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

मिरा रोड येथे एका कार्यक्रमात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मिरा-भाईंदरला तात्काळ पाच दशलक्ष लिटर पाणी वाढवून दिले जाईल, असे घोषित केले होते. त्यानुसार दोनच दिवसात मिरा भाईंदरच्या पाणीपुरवठ्यात एमआयडीसीने पाच दशलक्ष लिटरने वाढ केली; परंतु हा दिलासा अवघे तीनच महिने टिकला आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच एमआयडीसीने हे पाणी पाच ते सात दशलक्ष लिटरने पुन्हा कमी केले आहे. डिसेंबर ते मार्च या महिन्यात एमआयडीसीकडून ११५/११४ दशलक्ष लिटर पाणी मिळत होते. मात्र आता तेच पाणी १०८/१०६ दशलक्ष लिटरवर आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मिरा भाईंदरच्या नागरिकांना तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. १५ एप्रिलला एमआयडीसीच्या जलवाहिनीवरील एअर व्हॉल्व फुटल्यामुळे दहा तास पाणीपुरवठा ठप्प झाला होता. हा पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोच स्टेम प्राधिकरणाची जलवाहिनी भिवंडीजवळ फुटली. त्याचा पाणीपुरवठाही चोवीस तास बंद होता. त्यामुळे गेल्या चार दिवसांपासून शहराचे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. त्यातच आता एमआयडीसीकडून पाणी कमी करण्यात आले असल्याचाही मोठा फटका बसू लागला आहे.

### एमआयडीसीकडून मंजूर कोट्यापेक्षा कमी पाणी

वास्तविक एमआयडीसीकडून मिरा भाईंदरसाठी १२५ दशलक्ष लिटर पाणी मंजूर आहे; परंतु एमआयडीसी केवळ ११० दशलक्ष लिटरच्या आसपासच पाणी देत आहे. एमआयडीसीकडून पूर्ण कोट्यानुसार पाणी मिळण्यासाठी मिरा भाईंदरचा संघर्ष सुरू आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तातडीने पाच दशलक्ष लिटर पाणी वाढवून दिले व कोट्यातील शिल्लक राहिलेले पाणी सहा महिन्यांत वाढवून दिले जाईल, असे आश्वासन दिले होते; परंतु खुद्द उद्योगमंत्र्यांच्या या आश्वासनाचे एमआयडीसीकडून मात्र पालन केले जात नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# नालासोपारा शहरात पाणीबाणी

## माजी नगरसेवकांनी घेतली आयुक्तांची भेट

वसई, ता. १९ (बातमीदार) : उन्हाळ्याचे दिवस असताना पाण्याची समस्या भेडसावत असल्याने नागरिकांतून रोष व्यक्त केला जात आहे. अशात नालासोपारा शहरात गेल्या दोन महिन्यांपासून पाण्यासाठी दगदग करावी लागत असल्याने माजी उपमहापौर उमेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी महापौर रूपेश जाधव यांच्या उपस्थितीत पंचवीसहून अधिक माजी नगरसेवकांनी महापालिकेला धडक देत आयुक्तांना पाण्याबाबत जाब विचारला.



वसई : माजी नगरसेवकांनी पाणीप्रश्नी आयुक्तांची भेट घेतली.

वसई-विरार शहरात सद्यस्थितीत पाण्याची समस्या बिकट होत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून विरार, नालासोपारा शहरातील नागरिक पालिकेवर मोर्चा आणत आहेत. अशात दोन दिवसांपूर्वी विरारमध्येदेखील मोर्चा काढण्यात आला असतानाच माजी नगरसेवक प्रशासनाच्या विरोधात एकवटल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाकडून पाणीप्रश्नावर तोडगा काढला जात नाही त्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे त्यामुळेच नागरिक हे माजी नगरसेवकांकडेदेखील तक्रारी घेऊन जात आहेत. नालासोपारा शहरातील पूर्व व पश्चिम भागात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई भेडसावत आहे. त्यामुळे माजी नगरसेवकांनी थेट महापालिकेचे मुख्यालय गाठले व नागरिकांच्या पाण्याची व्यवस्था करा, अशी आग्रही मागणी लावून धरली आहे.

### आठ दिवसांत पाणी पुरवठा सुरळीत : आयुक्त

माजी नगरसेवकांनी आयुक्तांची भेट घेत पाणी समस्या सोडवण्याची मागणी केली. त्यानुसार आठ दिवसांत प्रश्न निकाली काढून पाणी पुरवठा सुरळीत होईल, असे आश्वासन आयुक्त अनिलकुमार पवार यांनी माजी महापौर रूपेश जाधव, माजी उपमहापौर उमेश नाईक आणि माजी नगरसेवकांना दिले.

नालासोपारा शहरात पाणी येत नाही; मात्र प्रशासन याकडे लक्ष देत नाही, नागरिकांना पाण्याची समस्या जाणवत आहे. कमी दाबाने पाणी येणे, जलवाहिनी गळती तसेच अनेक ठिकाणी पाणी नागरिकांना मिळत नाही. यासंबंधी आयुक्तांची भेट घेतली.
- उमेश नाईक, माजी उपमहापौर

CamScanner

सामना पा. नं. ७.



शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी बुधवारी पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पांबाबत पोलीस महासंचालक ( गृहनिर्माण ) अर्चना त्यागी यांची भेट घेऊन चर्चा केली. सोबत आमदार ॲड. अनिल परब, उपनेते मिलिंद वैद्य, विभागप्रमुख आशीष चेंबूरकर.

# पोलिसांच्या घरांची पात्रता यादी त्वरित द्या!

## आदित्य ठाकरे यांची मागणी

### महासंचालक अर्चना त्यागी, आयुक्त फणसाळकर यांची घेतली भेट

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी आज वरळी आणि मरोळ येथील पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पांबाबत पोलीस महासंचालक आणि पोलीस आयुक्त यांची भेट घेऊन चर्चा केली. वरळी, नायगाव आणि ना. म. जोशी मार्गावरील बीडीडी चाळींमध्ये पोलिसांना देण्यात येणाऱ्या घरांसाठी पात्रता यादी लवकरात लवकर बनवली जावी तसेच सेवानिवृत्त पोलिसांची रोखून ठेवलेली ग्रॅच्युईटीची रक्कमही त्यांना मिळावी, अशा मागण्या यावेळी आदित्य ठाकरे यांनी केल्या.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी पोलीस महासंचालक (गृहनिर्माण) अर्चना त्यागी, पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आणि अतिरिक्त आयुक्त (प्रशासन) एस. जयकुमार यांच्याशी पोलिसांच्या घरांबाबत सविस्तर चर्चा केली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात वरळी आणि मरोळ येथील पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पांच्या उभारणीच्या कामावर वेगाने कार्यवाही होत होती. त्याचप्रमाणे माहीम येथील गृहनिर्माण प्रकल्पाच्या कामालाही गती मिळावी अशी भूमिका आदित्य ठाकरे यांनी मांडली.

वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळी सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी फेडरेशन (नियोजित) या संस्थेने यासंदर्भात ■ पान ८

**सेवानिवृत्त पोलिसांची रोखलेली ग्रॅच्युईटी द्या**

१ जानेवारी २०२० पूर्वी निवृत्त झालेल्या पोलिसांची ग्रॅच्युईटीची ८० टक्के रक्कम तर त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्यांची १०० टक्के रक्कम या घरांसाठी रोखून ठेवण्यात आली आहे. ती रक्कम पोलिसांना दिल्यास त्यांना घरासाठी असलेला बांधकाम खर्च तसेच नोंदणी खर्चाची रक्कम भरण्यास अडचण येणार नाही असाही मुद्दा आदित्य ठाकरे यांनी या भेटीमध्ये मांडला.

CamScanner

पुण्यनगरी ५-५-१९.

# मीरा-भाईंदरच्या फलकांचे स्ट्रक्चरल ऑडिट

## पुण्यातील भीषण दुर्घटनेनंतर प्रशासन सतर्क, नोटिसा बजावण्यास सुरुवात

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात महापालिकेचे व खासगी असे जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. अवकाळी पावसामुळे पुण्यात जाहिरात फलक पडून अपघाती काही नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर मीरा-भाईंदर शहरात खबरदारीच्या उपाययोजना म्हणून महापालिकेने तयारी सुरू केली आहे. शहरात लावण्यात आलेले जाहिरात फलक ठेकेदारांना स्ट्रक्चरल ऑडिट तपासून घेण्याच्या नोटिसा देण्यास जाहिरात विभागाकडून सुरुवात करण्यात आली आहे.



शहरात महापालिकेने व काही खासगी ठेकेदाराने मुख्य चौकात व रस्त्यालगत जवळपास १०० पेक्षा जास्त मोठे जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. महापालिकेने त्यांच्या मालकीचे फलक जाहिरात करण्यासाठी ठेकेदाराला दिली आहेत. या जाहिरात फलकाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यासाठी पालिकेकडून दरवर्षी मे महिन्यात नोटिसा दिल्या जातात. त्यानंतर जाहिरात फलकाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल पालिकेला सादर करणे बंधनकारक आहे. पावसाळ्यात वादळी-वाऱ्यामुळे जाहिरात फलक पडून अपघात होण्याची शक्यता असल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही कार्यवाही दरवर्षी केली जाते. काही दिवसांपूर्वी पुण्यात अवकाळी पाऊस आल्यामुळे जाहिरात फलक पडून मोठा अपघात झाला आहे. या अपघातात काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

### अहवाल सादर न करणाऱ्यांवर कारवाई

अशी दुर्दैवी घटना शहरात घडू नये, यासाठी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मे महिन्याऐवजी आताच नोटिसा देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नोटिसा तयार केल्या जात असून, येत्या एक-दोन दिवसात ठेकेदारांना नोटिसा देण्यात येणार आहेत. महापालिकेकडून खबरदारीची उपाययोजना केली जात असल्यामुळे अशी कोणतीही घटना घडलेली नाही, ज्यामुळे नागरिकांना त्रासदायक ठरेल. जाहिरात विभागाने सतर्कता घेऊन लगेच स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल सादर करावा. जे ठेकेदार अहवाल सादर करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांनी दिली आहे.

CamScanner

नवभारत

## QUICK NEWS

### थाने में पहुंचाती थी खाने का डब्बा, बनी सिपाही



भायंदर. बचपन से पुलिस थानों में खाने का डब्बा पहुंचाने का कार्य करने वाली कु. राणी प्रमोद हरसूले अब खुद महिला पुलिस सिपाही बन गई है. मंगलवार को नवघर पुलिस थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विजय पवार ने कु. राणी को पुष्पगुच्छ देकर सम्मानित किया और उसके उज्वल भविष्य की शुभकामनाएं दी. बता दें कि कु. राणी प्रमोद हरसुले के पिताजी आईडीबीआई बैंक की मुख्य शाखा से 2021 में स्वेच्छा सेवानिवृत्त हुए. मां मीरा घरेलू मेस चलाने का कार्य करती थी. राणी बचपन से ही अपनी मां के साथ डब्बा तैयार करती थी और कक्षा चौथी में पढ़ते समय से ही मीरा भायंदर शहर के पुलिस थानों में पुलिसकर्मियों को खाने का डब्बा पहुंचाने का कार्य करती थी.

# पालघर : उद्धव-शिंदे गुट में बढ़ी खींचतान

## मनोनीत नगरसेवक चयन पर माहौल गरमाया

■ पालघर, नवभारत न्यूज़ नेटवर्क. पालघर नगर परिषद में 2 सीटों पर मनोनीत नगरसेवक पद के लिए होने वाले चयन को लेकर राजनीतिक माहौल गर्म हो गया है. इस पद पर होने वाले चयन को लेकर उद्धव ठाकरे और एकनाथ शिंदे गुट में खींचतान तेज हो गई है. जहां एक तरफ उद्धव ठाकरे गुट के नगरसेवक और स्थानीय नेता इस पद पर अपने लोगों का चयन करने की कोशिश में हैं, वहीं दूसरी तरफ शिंदे गुट के स्थानीय नेता इन दोनों पदों पर अपना कब्जा जमाकर उद्धव ठाकरे को झटका देने के लिए जुटे हैं. चार साल के अंतराल के बाद खाली पड़े इन 2 सीटों के लिए गुरुवार को चयन होने वाला है. जबकि बीजेपी ने 3 साल पहले ही अपने हिस्से की एक सीट पर अरुण माने का चयन कर दिया था. बता दें कि 2019 में पालघर नगर परिषद के घोषित चुनाव परिणाम के बाद शिवसेना के हिस्से में 2 सीट और भाजपा के हिस्से के 1 मनोनीत नगरसेवक की सीट आई थी. चुनाव परिणाम आने के तुरंत बाद भाजपा ने इस सीट पर एक नगरसेवक का चयन कर दिया था.




### 4 साल से लटका है मामला

शिवसेना में इस पद के लिए चल रही खींचतान के कारण शिवसेना पिछले 4 सालों में इन 2 पदों पर किसी का चयन नहीं कर पाई थी. अब 4 साल बाद परिस्थितियां बदल गई हैं और शिवसेना में दो गुट हो चुके हैं. 28 सीट वाली पालघर नगर परिषद में शिवसेना की सत्ता है, जिसमें शिवसेना के 14, भाजपा के 7, निर्दलीय 5 और एनसीपी के 2 सदस्य चुनकर आये हैं, जिसमें से शिवसेना के 5 नगरसेवक शिंदे गुट के नेताओं के संपर्क में बताये जा रहे हैं.

Mumbai Edition
20-april-2023 Page No. 2

CamScanner

9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, जबलपुर, ग्वालियर, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जयपुर, लखनऊ, जालंधर, रांची, कोलकाता से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

2050 तक होंगे 166 करोड़ के आसपास

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, गुरुवार, 20 अप्रैल 2023

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

# 'भरोसा सेल' बना नागरिकों के लिए भरोसा!

## एक साल में पंद्रह सौ आवेदन , समझा-बुझाकर उनकी टूटी-फूटी जिंदगी को फिर से जोड़ा

नाज लोपेज » वसई

मीरा-भाईंदर, वसई विरार पुलिस आयुक्तालय द्वारा भरोसा एकात्मिक बहुउद्देश्यीय सेवा केंद्र दो साल पहले महिलाओं और बच्चों को विभिन्न सेवाएं प्रदान करने और उन्हें मानसिक रूप से सशक्त बनाने के लिए स्थापित किया गया था।भरोसा सेल ने कई लोगों के जीवन को जोड़ने में मदद की है।भाईंदर और वसई भरोसा दोनों ही सेल का प्रदर्शन सराहनीय रहा है।भरोसा सेल को अंतिम पूर्ण वर्ष 2022 में अब तक यानी 15 माह में पंद्रह सौ आवेदन प्राप्त हुए हैं, जिनमें से 965 आवेदनों का निस्तारण किया जा चुका है,भरोसा सेल प्राप्त आवेदनों में से 80 प्रतिशत आवेदनों पर सभी को समझा-बुझाकर उनकी टूटी-फूटी जिंदगी को फिर से जोड़ने में सफल रहा है।

### लोगों का जीवन बर्बाद न हो

मीरा-भाईंदर शहर की बढ़ती आबादी और महिलाओं के खिलाफ हिंसा/पारिवारिक हिंसा की बढ़ती घटनाओं को देखते हुए,महिलाओं की शिकायतों को प्राथमिकता देने,उन्हें परामर्श और उनकी शिकायतों के निवारण के माध्यम से मनोवैज्ञानिक सहायता प्रदान करने के लिए भरोसा सेल का उद्घाटन किया गया है।लोगों का जीवन बर्बाद न हो, इसके लिए प्रति भरोसा सेल तरह-तरह की गतिविधियां चला रही है।इसमें कानून के प्रति लोगों को जागरूक करने के लिए कई जगहों पर जनजागरूकता कार्यक्रम आयोजित किए जा रहे हैं।भरोसा सेल के माध्यम से शहर में विभिन्न स्थानों पर कार्यक्रम कर 750 महिलाओं को जागरूक किया जा चुका है। वहीं 10 हजार विद्यार्थियों को स्कूल-कॉलेजों में कार्यक्रमों के माध्यम से विधिक जानकारी दी गई है।




### लोगों का जीवन कैसे बचे

भरोसा सेल में शिकायत प्रपत्र मिलने के बाद दोनों जोड़ों को बुलाया जाता है और फिर उन्हें आपस में बात करने के लिए कुछ समय दिया जाता है.यदि युवा लड़के और लड़कियां हैं, तो उन्हें अपने प्यार की यादों को याद दिलाने के लिए प्रेम गीत बजाए जाते हैं,उन्हें सिनेमा टिकट या भोजन भी भेजा जाता है ताकि वे एक-दूसरे के साथ समय बिता सकें और अपने बीच की खाई को पाट सकें।भरोसा सेल के माध्यम से लगातार प्रयास किया जा रहा है कि लोगों का जीवन कैसे बचे।

### बिना किसी शुल्क, पुलिस की मदद कर रहे

भरोसा सेल में शिकायत आवेदन प्राप्त होने के बाद, आवेदकों और गैर-आवेदकों को भरोसा प्रकोष्ठ में बुलाया जाता है और परामर्श समिति के माध्यम से उनकी काउंसलिंग की जाती है।समाज के कुछ प्रमुख लोग भी बिना किसी शुल्क के काउंसलिंग के लिए पुलिस की मदद कर रहे हैं, जिनमें 3 वकील, 2 डॉक्टर, कुछ एनजीओ शामिल हैं।भरोसा सेल के प्रति नागरिकों में अधिक जागरूकता पैदा करने की आवश्यकता है न्यायालय जाने से पूर्व भरोसा सेल की सहायता से काउन्सलिंग द्वारा अनेक मामलों का समाधान किया जा सकता है। शहर में जितने लोगों को इस मामले की जानकारी नहीं है।

### बिना डरे भरोसा सेल का लाभ उठाए

ज्यादातर लोग भरोसा सेल में जाने के बजाय कोर्ट चले जाते हैं और इस वजह से कई लोगों को अपनी रोजी-रोटी से हाथ धोना पड़ता है। भरोसा सेल की मदद से मामला सुलझने पर पैसा, समय, मानसिक तनाव सब कुछ बचेगा इसलिए लोगों को अनायास ही बिना डरे भरोसा सेल का लाभ उठाना चाहिए।कई पारिवारिक मामलों में भरोसा सेल के माध्यम से काउंसलिंग से उनके जीवन को फिर से सुचारू बनाने में मदद मिली है,भरोसा सेल उम्रदराज हो रहे कई बच्चों की और उनके परिवारों की काउंसिलिंग कर उनकी समस्याओं को दूर करने की कोशिश कर रही है।भरोसा सेल ने पिछले एक साल में कई लोगों की टूटी-फूटी जिंदगी को फिर से जोड़ा है।

CS CamScanner

# महिलांच्या सुरक्षतेकरिता 'नारीसुरक्षा ॲप'

भाईंदर - मीरा-भाईंदर शहरातील सर्व महिला सुरक्षित राहाव्या यासाठी जल्लोष नारीशक्ती समितीमार्फत लवकरच 'नारीसुरक्षा ॲप' सुरू करण्यात येणार असून, यावर शहरातील सर्व पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे, महानगरपालिका आयुक्त व महत्त्वाच्या विभागांचे क्रमांक मदतीकरिता उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्याच बरोबर शहरातील महिलांना रात्रीच्या वेळी प्रवास करताना अथवा कोणत्याही अडचणीत मदत व्हावी याकरिता एक हेल्पलाइन क्रमांक देखील 'नारीसुरक्षा ॲप' मार्फत देण्यात येणार असल्याचे संदीप राणे यांनी सांगितले आहे.

'नारीसुरक्षा ॲप' वेगळ्या प्रकारे काम करणार असून, त्यात कोणताही पदाधिकारी नसून सर्वजण समान असणार आहेत. महानगरपालिकेच्या मार्फत देण्यात येणाऱ्या महिलांसाठीच्या सूचना-सुविधांचे देखील माहिती या ॲपवर टाकण्यात येणार आहे. मीरा-भाईंदर शहर मोठे असून लोकसंख्या देखील जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी पोहचणे शक्य नसल्याने 'नारीसुरक्षा ॲप' मार्फत शहरात असणाऱ्या ६ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सतत समाजसेवा करणाऱ्या अथवा महिलांच्या हक्कासाठी, मदतीकरिता, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाकरिता लढणाऱ्या महिलांचा एक ग्रुप प्रत्येक विभागात तयार करून त्यांचा क्रमांक देखील ॲपवर टाकण्यात येणार आहे. जेणेकरून मदतीच्या वेळी ज्या परिसरात गरज असेल त्यांना संपर्क साधून मदत मिळवता येणार आहे. 'नारीसुरक्षा ॲप' ने नक्कीच महिलांना मदत मिळणार असल्याचे संदीप राणे यांनी सांगितले आहे.

CamScanner

सकाळ

# ७४ महिलांचा वनवास संपुष्टात

## वेश्या व्यवसायाला प्रवृत्त करणाऱ्यांवर ५६ गुन्हे

*प्रसाद जोशी*

वसई, ता. १९ (बातमीदार) : वसई-विरार मिरा-भाईंदर परिसरात चोरी छुपे वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणाऱ्यांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. आतापर्यंत एकूण ७४ पीडितांची सुटका करून विविध पोलिस ठाण्यांत ५६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात महिला आरोपींची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे.

वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात विविध लॉज, पार्लर आणि सदनिकेच्या आड वेश्या व्यवसाय केला जात असल्याचे पोलिसांनी केलेल्या कारवाईतून समोर आले आहे. हा व्यवसाय चोरी-छुपे होत आहे. वसईसह, मिरा-भाईंदर परिसरात अशा घटना होत असताना पोलिसांनी करडी नजर ठेवत बनावट ग्राहकांच्या माध्यमातून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या माध्यमातून आरोपींना गजाआड केले आहे.

### ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर

सर्व प्रथम ग्राहकांना ऑनलाईन यंत्रणेच्या माध्यमातून मुलींचे फोटो दाखवले जातात. त्यानंतर सौदा केला जातो. त्यानंतर ठरलेल्या ठिकाण दलाल मुलींना तिथे नेतात. अशा प्रकारे हा सर्व व्यवसाय ऑनलाईन यंत्रणेच्या माध्यमातून चालवला जातो.



### पार्लरच्या नावाखाली अश्लील धंदे

१ काही ठिकाणी मसाज पार्लरच्या नावाच्या आड अश्लील धंदे केले जातात. अशा ठिकाणची माहिती पोलिसांना मिळताच बोगस गिऱ्हाईक पाठवून शहनिशा करत सापळा रचून धाड टाकली जाते आणि मुलींची सुटका करून आरोपींना अटक करत गुन्हे दाखल केले जात आहे.

२ एप्रिल महिन्यात लॉजिंगमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने नालासोपाऱ्यामधील कळंब येथे एका पीडित महिलेची या जोखडातून सुटका; तर ३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### लॉजमध्ये छुपा व्यवसाय

शहरात काही ठिकाणी लॉजच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय चालवला जातो. येथील कर्मचारी ग्राहकांशी संवाद साधून व्यवस्था होईल, असे सांगतो. अशा ठिकाणी पोलिसांनी नजर ठेवत अनेकांना गजाआड केले आहे.

### ३८ महिलांवर कारवाई

वेश्याव्यवसाय करणाऱ्यांत महिला आरोपींचाही समावेश आहे. गेल्या पंधरा महिन्यांत अशा एकूण ३८ महिलांवर कारवाई करण्यात आली.

### पोलिसांची कारवाई






CS CamScanner

# भरोसा सेलकडे वर्षभरात पंधराशे अर्ज

भाईंदर - महिला व बालक यांना विविध सेवा पुरवून त्यांना मानसिक बळ देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी भरोसा या एकात्मिक बहुउद्देशीय सेवा केंद्राची स्थापना मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत दोन वर्षापूर्वी करण्यात आली आहे. भरोसा सेलमार्फत अनेकांचे संसार जोडण्यास मदत झाली आहे. भाईंदर व वसई या दोन्ही भरोसा सेलची कामगिरी प्रशंसाजनक आहे. भरोसा सेलकडे २०२२ या पूर्ण वर्षभरात ते आजपर्यंत म्हणजेच १५ महिन्यात पंधराशे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ९६५ अर्जांचा समझोता करण्यात आला आहे. आलेल्या अर्जांपैकी ८० टक्के अर्जांवर सर्वांना समजवून त्यांचे तुटलेले संसार पुन्हा जोडण्यास भरोसा सेलला यश प्राप्त झाले आहे.

मीरा-भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या व महिला हिंसाचार/कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या तक्रारींना प्राधान्य देणे, त्यांना समुपदेशन करून मानसिक आधार देणे व त्यांच्या तक्रारींचे निवारण करणे याकरता भरोसा सेलचे उद्घाटन करण्यात आले आहे. लोकांचे संसार तुटले नाही पाहिजेत, याकरता वेगवेगळ्या प्रकारच्या कृती भरोसा सेल राबवत आहे. त्यात अनेक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेऊन लोकांमध्ये कायदे विषयक जागरूकता निर्माण करण्यात येते. भरोसा सेलमार्फत शहरात वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम घेऊन ७५० महिलांना जागरूक करण्यात आले आहे. त्याचबरोबर शाळा-कॉलेजमध्ये कार्यक्रम घेऊन १० हजार विद्यार्थ्यांना कायदे विषयक माहिती देण्यात आली.

भरोसा सेलमध्ये तक्रार अर्ज आल्यानंतर दोन्ही जोडप्यांना बोलावले जाते. त्यानंतर त्यांना काही काळ बोलण्याकरिता एकांत दिला जातो. तरुण मुले-मुली असतील, तर त्यांना एकमेकांच्या प्रेमाच्या आठवणी करून देण्यासाठी प्रेमगीत ऐकवली जातात. त्यांना एकमेकांच्या सोबत वेळ देता यावा व आपापसातील दुरावा दूर करता यावा याकरता त्यांना सिनेमा तिकीट अथवा जेवण्याकरिता देखील पाठवले जाते. लोकांचे संसार कशा प्रकारे टिकून राहतील याचा प्रयत्न भरोसा सेलमार्फत सतत करण्यात येत असतो.

भरोसा सेलमध्ये तक्रार अर्ज दाखल झाल्यानंतर सदर तक्रारी अर्जातील अर्जदार व गैरअर्जदार यांना समक्ष भरोसा सेल येथे बोलवून समुपदेशन समितीच्या मार्फत त्यांचे समुपदेशन घडवून आणण्यात येते. समुपदेशन करण्यासाठी समाजातील काही प्रतिष्ठित व्यक्तीदेखील कोणत्याही प्रकारची फी न घेता पोलिसांना मदत करत आहेत. यात ३ वकील, २ डॉक्टर, काही एनजीओ यांचा देखील समावेश आहे. भरोसा सेल या उपक्रमाबाबत नागरिकांमध्ये अधिक जागरूकता होणे आवश्यक आहे. कोर्टाची पायरी चढण्या अगोदर भरोसा सेलच्या मदतीने समुपदेशन करून अनेक प्रकरणे सोडवता येऊ

शकतात. शहरातील अनेक लोकांना याबाबत अद्याप माहिती नसल्याने बहुतांश लोक भरोसा सेलकडे न जाता कोर्टाची पायरी चढतात व यामुळे अनेकांना आपले संसार गमवावे लागले आहेत. भरोसा सेलच्या मदतीने प्रकरण सोडवल्यास माणसाचे पैसे, वेळ, मानसिक ताण हे सर्व काही वाचणार आहे. त्यामुळे लोकांनी उत्स्फूर्तपणे न घाबरता भरोसा सेलचा फायदा घ्यावा. अनेक कौटुंबिक प्रकरणात भरोसा सेलच्या माध्यमातून समुपदेशन घडवून त्यांचे संसार पुन्हा एकदा सुरळीत होण्यास हातभार लागला आहे. वयात येणाऱ्या अनेक मुलांचे प्रश्न त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे समुपदेशन करून सोडवण्याचा प्रयत्न भरोसा सेल करत आहे. गेल्या वर्षभरात अनेक जणांचे तुटायला आलेले संसार समुपदेशन करून भरोसा सेलने पुन्हा जोडले आहेत.

CamScanner

लोकमत

# सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शिडीवरून खाली पडून झालेल्या अपघातात मृत्यू झाल्याप्रकरणी मालकाविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा वसईत दाखल करण्यात आला आहे.

नायगावच्या स्टार सिटी येथील एमएसईबीच्या जवळील मोकळ्या जागेत लोखंडी स्ट्रक्चर बनविण्याच्या कामासाठी १५ जून २०२१ रोजी रात्री सोनेश्वरनगर येथे राहणारे बबलू सत्यनारायण प्रजापती गेले होते. रात्री लोखंडी पाइपला वेल्डिंग करत असताना शिडीवरून खाली पडल्याने त्यांचा मृत्यू झाला.

मृत व्यक्तीची त्यावेळी मानसिक स्थिती ठीक नव्हती, तरीही जागा विकासक भावेश सोलंकी यांनी सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेतल्याने पतीचा अपघाती मृत्यू झाल्याचा आरोप मृताची पत्नी रिंकू प्रजापती यांनी केला आहे. मंगळवारी नायगाव पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 20, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# वसईत रक्तदान, मोफत आरोग्य तपासणी शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** उत्तरांचल मित्र मंडळाच्या विद्यमाने वसईच्या सनसिटी येथील बद्रीनाथ मंदिर परिसरात २३ एप्रिलला सकाळी साडे नऊ ते दुपारी तीन वाजताच्या दरम्यान रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

वसई तालुक्यातील रक्तपेढ्यांत सध्या रक्ताचा तुटवडा जाणवू लागला आहे. येत्या रक्तदान शिबिरात वसईकरांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दर्शवावा, असे आवाहन उत्तरांचल मित्र मंडळ आणि पालघर मिरर यांच्या वतीने करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन माजी महापौर नारायण मानकर आणि माजी नगरसेवक भरत गुप्ता, संदेश वाघ व उत्तरांचल मित्र मंडळाचे अध्यक्ष माधवानंद भट्ट यांनी केले आहे.

रक्ताच्या तुटवड्यामुळे रुग्णांचा जीव दगावू नये म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी आयोजकांनी या रक्तदान शिबिराची तयारी सुरू केली आहे. तसेच पुढील रविवारी होणाऱ्या या शिबिरात वसई पश्चिमेतील साफल्य हॉस्पिटलमधील साथिया रक्तपेढी यांचा सहयोग असणार आहे.

शिबिरात येताना रुग्णांनी वैद्यकीय रिपोर्ट सोबत आणावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. याच शिबिरात डोळे तपासणी व माफक दरात चष्म्यांचे वितरण होणार आहे.

Hello Vasai
Page No. 4 Apr 20, 2023
Powered by: erelego.com

CamScanner